15वी भारत-ओमान धोरणात्मक सल्लागार गट बैठक

भारत-ओमान धोरणात्मक सल्लागार गटाची 15वी फेरी 7 ऑक्टोबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे सह-अध्यक्षपद भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सचिव (सीपीव्ही आणि ओआयए) सुश्री श्रीप्रिया रंगनाथन आणि ओमानच्या सल्तनतच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे राजकीय घडामोडींचे अवर सचिव महामहीम शेख खलिफा बिन अली अल हार्ती यांनी भूषवले.

2. या बैठकीदरम्यान राजकीय आणि धोरणात्मक सहकार्य, व्यापार व गुंतवणूक, भारत-ओमान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराची अंमलबजावणी, ऊर्जा, संरक्षण व सागरी सहकार्य, डिजिटल क्षेत्रातील सहकार्य, शिक्षण, संस्कृती आणि जनसंपर्क यांसह द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा आणि चालू उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

3. दोन्ही बाजूंनी प्रादेशिक सुरक्षा, सागरी सुरक्षा आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीशी संबंधित घडामोडींसह परस्पर हिताच्या प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही विचारविनिमय केला.

4. उभय बाजूंनी अलीकडील वर्षांमध्ये दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ होत असल्याचे नमूद केले आणि विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.

नवी दिल्ली

07 ऑक्टोबर 2026